DATE /1/

# "थॅंक्स रे"

"ऑफीसमध्ये आज निःशब्द शांतता पसरली होती. सुरेश त्याच्या साहेबांच्या केबिनमधून हसत होवून बाहेर पडतांना सगळ्यांनी बघितले. पण आपण काही बघितलेच नाही, असा आव आणून सगळे आपापल्या कामात गर्क असल्याचे भासवत होते. सुरेश आपल्या चेअरवर धपकन येवून बसला. कपाळावर हात ठेवून शून्य नजरेने इकडे तिकडे बघू लागला, जणू काही सगळं ऑफीस डोळ्यात साठवून घेत आहे.

त्याला कारणही तसच घडल होतं. ऑफीस सुरू होण्यापूर्वीच 'सुरेखा' सुरेशची पत्नी साहेबांच्या केबिनमध्ये आली होती. शिपाई तिला ओळखत असल्यामुळे त्याने साहेब येईपर्यंत बसायला सांगितले. नेमका सुरेश ऑफीसच्या कामाने दुसऱ्या ऑफीसमधून काम करून उशीरा येणार होता. नेहमीप्रमाणे साहेब आले, बघतात तो सुरेखा दिसली. ती म्हणाली 'साहेब, मला माझ्या नवऱ्याबद्दल काही माहिती जाणून घ्यायची आहे.' साहेबांनी तिला पहिले शांत होवून पाणी प्यायला दिले. आणि 'आता बोला, काय सांगायचे आहे ते.' असे म्हटल्याबरोबर सुरेखा एकदम उसळून म्हणाली, 'साहेब, सुरेश ऑफीसमध्येही विक्षिप्त वागतो का ?? उगाचच चिडचिड करतो का ? आणखीही असेच ताडताड काही ती बोलत होती, तिला मध्येच थांबवत ते म्हणाले, 'अहो सुरेखा मॅडम, हे बघा, तुम्ही म्हणता तसे मिस्टर सुरेश इथे वागत नाहीत. उलट कंपनीचे कुठलेही काम ते अतिशय जबाबदारीने पार पाडतात. नेहमी कंपनीच्या भल्याचाच विचार त्यांच्या कृतीतून व्यक्त होत असतो. तुम्ही असं का म्हणता, काय म्हणायचं आहे तुम्हाला ??

सुरेखा हुंदके देवून रडायलाच लागली. म्हणाली, सुरेश घरी विचित्र वागतो. घरातून चांगला मूड तर घरातील रौद्रावतार धारण करतो. कुठल्या गोष्टीवरून त्याचं काय बिघडेल कळतच नाही. दोन चांगली मुलं आहेत, त्यांच्याकडेही दुर्लक्ष करतो. सगळं मलाच बघावं लागतं. मुलांकडे लक्ष द्या, आला गेला, पै पाहुणा त्यांची उस्तवार मलाच करावी लागते. जरा कुठे थोडीशी चूक झाली की झालं- त्याला संधीच मिळते, माझ्यावर

तोंडसुख घ्यायला. खरंच मला काही कळत नाही कसं वागावं ते दुहेरी व्यक्तिमत्व का काय म्हणतात तसं आहे त्याचं !! बाहेरच्या माणसासमोर वेगळं आणि माझ्यासोबत असतांना वेगळं वागतो. त्यामुळे आमची आजकाल नेहमी भांडण होतात. मुलं बिचारी लहान आहेत. भेदरून जातात. असंच बरंच काही सांगू लागली. साहेबांना तिचं म्हणणं पटू लागलं. त्यांनी तिला सांगितलं की, ते सुरेशला जाब विचारतील, समजावून सांगितलं. की कळेल त्याला - तुम्ही घरी जा.

सुरेखा सगळ्या स्टाफसमोरून अशी निघून गेली की जणू कोणाला ओळखतच नाही. 'असो, काय झालं ते नंतर कळेलच. आपण आपलं काम करूया. असं त्याच्या सहकारी मित्रांनी म्हटलं, आणि त्यांचं रोजचं रुटीन वर्क सुरू झालं. थोड्या वेळाने सुरेश ऑफिसमध्ये पोहचला. सगळेजण आपल्याकडे विचित्र नजरेने का बघतात तेच त्याला कळेना. लगेचच साहेबांचं बोलावणं आलं तो साहेबांशी कामाबद्दल बोलू लागताच ते म्हणाले, थांबा, मला तुमच्याशी थोडं वैयक्तिक बोलायचं आहे. तुमची वागणूक अशी दुहेरी असेल, तुम्ही तुमच्या पत्नीला छळत असाल हे मला खरंच वाटलं नाही. पण स्वतः सुरेखा तुमची पत्नी इथे आली. कळवळून तिने संसाराची रडकथा सांगितली. मला खरंच तुमच्याकडून अशी अपेक्षा नव्हती. मी हीरा समजलो तुम्हाला पण तुम्ही असं कसं वागु शकता ?? मला बिलकुल सफाई देवू नका. तुम्ही गेलात तरी चालेल. एक शब्दही बोलू नका सध्या माझ्याशी!

सुरेशच्या पायाखालची जमीनच सरकली. बापरे, सुरेखा इथे आली म्हणजे संपलंच सगळं. तिच्या नाटकी वागण्याला सर भुलले आणि मला गेट आऊट म्हणाले. मी आता इथे क्षणभरही थांबू शकत नाही. माझा स्वाभिमान मला इथे काम करू देणार नाही. अपमान सोसला जाणार नाही. कशी नजरेला नजर देवू मी सगळ्यांच्या ??

त्याने तडकाफडकी राजीनामा दिला. साहेबही द्विधा मनःस्थितीत होते. कोणती बायको नवऱ्याविरुद्ध उगाचच कागाळ्या करेल असे वाटल्यामुळे त्याचं तिरमिरीत

त्यांनी राजीनामा मंजूर केला आणि, सुरेशचा ऑफीसशी असलेला संपर्क संपला...

घरी येताच सुरेखाची नेहमीची कटकट सुरू झाली. हेच का नाही आणलं येतांना?? मीच आहे म्हणून संसार करते आहे, वगैरे! लग्न झाल्यापासून सुरेशची अशीच ओढाताण होत होती. सुरेखा दिसायला चांगली पण त्या सुंदर चेहऱ्यामागे तिचा विक्षिप्त स्वभाव लपलेला होता. कधी ती प्रेमाने वागे, कधी एकदम झटका आल्यासारखी त्रागा करी. नोकरीमुळे सुरेश शहरात राहायचा. गावाकडे आई वडील थोडी फार शेती होती, घर होतं तिथे राहायचे. त्यांना सुनेचे तऱ्हेवाईक वागणे विचित्र वाटायचे. पण असतो एकेकाचा स्वभाव, असं म्हणून दुर्लक्ष करू लागले. सुरेशला तर रोजच तिला सामोरे जावे लागायचे. थोडक्यात म्हणजे ती एक मनोरुग्ण होती. आणि ते ती मान्य करत नसल्यामुळे डॉक्टरकडेही येत नव्हती. तिच्या वडीलांना विचारले तर ती खूप लाडात वाढल्यामुळे थोडी संतापी झाली असे त्यांनी सांगितले. आपलं नशीबच खोटं असं समजून सुरेश जमेल तसं तिला सांभाळत होता. पण आज तर तिने कमालच केली...

सुरेशने नोकरी सोडल्याचे सांगून आपलं बिऱ्हाड गावाला हलवावं लागेल असं सांगितले. त्याप्रमाणे ते गेलेसुध्दा!! सुरेशला शहरातील राहणीची, नोकरीची सवय असल्याने खेड्यातील शेतातील कष्टाची कामे झेपत नव्हती. चुलत भावांसोबत खडीचा व्यवसाय करून पाहिला. तेही जमेना. उलट दारू पिण्याची सवय लागली. वडीलांचे पुण्याचे मित्र नानासाहेब एकदा सहज भेटायला आले असतांना त्यांच्या लक्षात सगळी परीस्थिती आली. त्यांनी सुरेशला स्वतःसोबत नेले. सासवडच्या पुढे त्यांच्या नातेवाईकांचा मोठा मळा होता. तो सांभाळण्यासाठी सुरेशची त्यांनी शिफारस केली. राहायला छोटेखानी कौलारू घरपण होते. सुरेशने मनापासून काम करायचे ठरवले. कामामध्ये गुंतून घेतले. आपोआपच दारूचे व्यसनही सुटले. जीवनाची घडी नानाकाकांमुळे बसली म्हणून त्याला त्यांच्याबद्दल कृतज्ञता वाटू लागली. मालकही

सुरेशच्या कामावर खुष होते. सुरेशने कोरोनाच्या कठीण काळात लोकांच्या सोयीसाठी मल्याशेजारी खाण्याचे हॉटेल काढण्यास सुचविले. मूळात तो हुशार व कल्पक असल्यामुळे संधी मिळताच त्याने सोनं केलं. मळ्याचा - उपहारगृहाचा व्यवस्थापक म्हणून त्याला सगळे लोक मान देऊ लागले. सुरेखा व दोन्ही मुलांना तो घेऊन आला. त्यांना शार्दुन टाकले. निसर्गरम्य वातावरणामुळे आणि सुरेशपासून दूर राहिल्यामुळे सुरेखालाही सुरेशची किंमत कळली; त्याच्या प्रेमळ उपदेशामुळे ती डॉक्टरी उपचार घेण्यास तयार झाली.

असं करता करता त्यांचा संसार आधीपेक्षा बराचसा सुखाने सुरू झाला. मुलं हुशार होती. सतीश लॉ करू लागला. आणि सुनीता हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करू लागली. संसाराची घडी व्यवस्थित बसली. सुनिताला तर एका चांगल्या ठिकाणाहून मागणीही आली. परीक्षेनंतर तिचे लग्न करण्याचे त्यांनी ठरवले.

बाबांच्या मित्राने नानाकाकांनी आपलेपणाने जी मदत केली त्याबद्दल सुरेश-सुरेखा कृतज्ञ आहेत. जीवनातील खरा आनंद काकांनी केलेल्या सहकार्यामुळे त्यांना मिळाला. सुनिताच्या लग्नाची गोड बातमी त्यांना सांगण्यासाठी आपण त्यांना सांगूया आणि लग्नाच्या वेळेस चांगलं एक महिना आधी या असाही प्रेमळ आग्रह करूया. असेही सुरेखा मनापासून म्हणाली—!! आपल्या माणसांची भक्कम साथ असतांना मंगल कार्य मंगलच होणार याची खात्री दोघांनाही होती. आता सर्व छानच होणार या आनंदात दोघेही स्वप्नात रंगले !!

शब्दांकन: सौ. विजया जोशी.     श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये

